महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

## ( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

पोमसं /८ अ /नि.सू.२०२१-२२ (स्वीय सहा ते व.स्वीय सहा. / जिल्हा /३८ /२०२१     मुंबई ,     दिनांक : १५/११/२०२२

वाचा :- शासन आदेश, गृह विभाग, क्रमांक रापोसे १२२२/प्र.क्र.४१/पोल-१अ,दि.०३.११.२०२२

**-: आदेश :-**

संदर्भाधीन दि.०३.११.२०२२ च्या शासन आदेशानुसार (प्रत संलग्न) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील खालील नमूद " स्वीय सहायक " (गट-ब) दर्जाच्या अधिका-यांना " वरिष्ठ स्वीय सहायक " (गट-अ) या पदावर पदावर तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात आली आहे. सदर शासन आदेशास अनुसरुन त्यांची पदोन्नतीवर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून तात्पुरत्या स्वरुपात त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये पदोन्नतीवर पदस्थापना करण्यात येत आहे :-

| अ.क्र | स्वीय सहायकांचे नाव | सध्याचे नियुक्तीचे कार्यालय | पदस्थापनेवरील कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती निलांबरी महेंद्र भिंगारदिवे | पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, | पोलीस आयुक्त, पुणे शहर |
| २. | श्री. महादेव इराप्पा व्हटकर | पोलीस आयुक्त, पुणे शहर | पोलीस आयुक्त, ठाणे शहर |
| ३. | श्री. अविनाश शेनफड प्रधान | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | पोलीस आयुक्त, नागपूर शहर |

२. उपरोक्त पदोन्नती, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधीन राहुन देण्यात येत आहे. तसेच सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरती स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधिनतेचा (rugularization) व सेवाजेष्ठतेचा (seniority) कोणताही हक्क असणार नाही.

३. सामान्य प्रशासन विभाग, यांचे शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.०७.०५.२०२१, यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयांच्या अधीन राहुन उक्त पदोन्नती देण्यात येत आहे.

**रजनिश सेठ**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, पुणे शहर / ठाणे शहर/ नागपुर शहर/ पिंपरी चिंचवड/ अमरावती शहर

१. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीअेच्वाय् /१०८२/सीआर्/११००(२)/असईआर्-३, दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना..सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ)अन्वये केली जाईल याची संबंधीत अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

२. उपरोक्त स्वीय सहायक यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील व ती शिक्षा निवडसूची वर्ष २०२१-२२ मध्ये संपुष्टात येत नसेल तर घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता सविस्तर अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशांची वाट पाहावी.

३. संबंधीत घटक प्रमुखांनी वर नमूद स्वीय सहायक यांचेविरुध्द उपरोक्त काहीच प्रलंबित नसेल तर, पदोन्नतीवर, लघुलेखकांची वाट न पाहता, नियुक्तीच्या ठिकाणी त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे आणि त्याप्रमाणे ह्या कार्यालयास कळवावे. संबंधीत घटक प्रमुखांनी कोणत्याही परिस्थितीत संबंधीतांना तातडीने कार्यमुक्त करावे. तसेच पदोन्नती नाकारावयाची असेल तर त्यांनी तसा अर्ज ७ (सात) दिवसांच्या आंत न चुकता या कार्यालयात सादर करण्याबाबतच्या योग्य सूचनाही त्यांना द्याव्यात.

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष.

२. सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० / १२ / ३६

(एस. जयकुमार)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचेकरिता

**<u>नियमित निवडसूची, २०२१-२२:</u>**

***पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या आस्थापनेवरील "जिल्हा लिपिक" संवर्गातील "वरिष्ठ स्वीय सहायक" या पदावर पदोन्नती देणेबाबत.***

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन आदेश क्र. रापोसे-१२२२/प्र.क्र.४१/पोल-१अ.

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन-४०००३२.

दिनांक : ०३ नोव्हेंबर २०२२.

<u>संदर्भ</u> :-

१) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/ प्र.क्र.१५९/ कार्या.-१२, दिनांक ०१.०८.२०१९.

२) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१.

३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र पोमसं/ ८अ/ नि.सू-२०२०-२१/(स्वीय सहा. ते व.स्वीय सहा.)/ जिल्हा/ ३८/ २०२१, दि.११.०२.२०२२ व २४.०५.२०२२.

<u>शासन आदेश</u>.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या आस्थापनेवरील "जिल्हा लिपिक" संवर्गातील "वरिष्ठ स्वीय सहायक" या पदावर पदोन्नती देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या "स्वीय सहायक" या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या "<u>नियमित निवडसूची, २०२१-२२</u>" यामध्ये समाविष्ट असलेल्या, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद अधिका-यांना, "वरिष्ठ स्वीय सहायक" या पदावर सेवाज्येष्ठतेनुसार तात्पुरत्या स्वरुपात, पुढील अटींवर, पदोन्नती देण्यात येत आहे-

| <u>अ.क्र.</u><br>(१) | <u>अधिका-याचे नाव</u><br>(२) |
|---|---|
| १. | श्रीम. निलांबरी महेंद्र भिंगारदिवे |
| २. | श्री. महादेव इराप्पा व्हटकर |
| ३. | श्री. अविनाश शेनफड प्रधान |

<u>अटी</u>:-

१) उक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) उक्त पदोन्नती ही शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१, यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३) उक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधीनतेचा *(regularization)* व सेवाज्येष्ठतेचा *(seniority)* कोणताही हक्क असणार नाही.

२. त्या अनुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी पुढील उचित कार्यवाही करावी.

३. हा शासन आदेश, सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने *[अनौपचारिक संदर्भ क्र.८१७/२०२२/का.-१२, दिनांक १९.०७.२०२२]* निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२२११०३१९२१४७५०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

(स्वप्निल गोपाल बोरसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री, गृह, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत-

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/ लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/ नागपूर.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे/ अमरावती.
५) संबंधित अधिकारी *(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत).*
६) निवड फाईल, पोल-१अ.